# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ३०८ /२०२४-२५ दिनांक : १५ / ०७/२०२४

**प्रति,**
**सिस्टम मॅनेजर,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

**(कांचन गायकवाड)**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ३०८ /२०२४-२५ दिनांक : १५ /०७/२०२४

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) श्रीपती ४-कानुंगो कॉ.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.२७/०६/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | सप्तपर्णी | २० ते २५ फुट | ०२ | १० वर्ष | सदरची झाडे श्रीपती ४-कानुंगो कॉ.ऑ.हौ.सो.लि. रॉयल कॉम्पलेक्स, पुनम सागर रोड, सेक्टर १० समोर, मिरारोड(पु.) येथिल सोसायटीच्या आवारत असून झाडाची मुळे पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या आतमध्ये गेले असून पिण्याच्या पाण्याची टाकी तुटली असून झाड संरक्षण भिंतीवर टेकलेले आहे. या कारणास्तव झाडे काढणे आवश्यक आहे. |
| २ | नारळ | २० ते २५ फुट | ०१ | ०८ वर्ष | सदरचे झाड श्रीपती ४-कानुंगो कॉ.ऑ.हौ.सो.लि. रॉयल कॉम्पलेक्स, पुनम सागर रोड, सेक्टर १० समोर, मिरारोड(पु.) सोसायटीच्या खेळण्याच्या ठिकाणी असून झाड एका बाजूने झुकलेले असून झाडाची मुळे जमिनीवर आलेली आहे. तसेच सदर ठिकाणी एका नागरिकाच्या डोक्यावर नारळ पडून इजा झाली आहे. त्या ठिकाणी लहान मुले खेळत असतात. जोराच्या वाऱ्याने झाड व झाडावरील नारळ पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |
| **२) श्री किसन मोतीराम लाबडे यांचे दि. ११/०६/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | काटेरी बोर | २५ ते ३० फुट | ०१ | १६ वर्ष | सदरचे झाड काजुपाडा गाव, बसस्टॉपच्या पाठीमागे मिरारोड (.पु) येथिल असून अर्जदार यांच्या घरासमोर असून धोकादायकरित्या वाढलेले आहे. तसेच झाडाला किड लागली आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका